# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**५९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २१/०९/२०२१**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१४/०९/२०२१ ते २०/०९/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२२/०९/२०२१ ते २६/०९/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ५२ | २८ | ३३ | २८ | २२ |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३१ | ३१ | ३० | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | २५ | २४ | २४ | २३ | २३ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८८ | ८८ | ९० | ९१ | ८८ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५९ | ६१ | ६१ | ६७ | ६७ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३ | ११ | ११ | ११ | १० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.<br>पुढील तीन दिवस काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे तर त्यानतरचे दोन दिवस हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे |
| सामान्य सल्ला | | **१) शेतात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच शेतात पाणी साचल्यास चर खोदुन अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.**<br>**२) पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली पिके शेडमध्ये किंवा प्लास्टिकच्या कागदाने झाकून ठेवावीत.**<br>**३) पावसाने उघडीप दिल्यास व वापसा आल्यानतरच पिकातील (आंतरमशागतीची, तणनियंत्रणाची, खते देणे, फवारणी इ.) कामे पुर्ण करावीत.**<br>४) शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल . शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत . तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>४) पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.<br>५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>६) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | पुढील तीन दिवस काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे तर त्यानतरचे दोन दिवस हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| भुईमुग | | वेळेवर पेरणी झालेल्या पिकाची काढणी करून घ्यावी. |
| बाजरी | | वेळेवर पेरणी झालेल्या पिकाची काढणी करून घ्यावी. |
| मका | दाणे चिकात असताना | अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणाकरिता थायमेथोक्झाम १२.६% + लँमडा सायहेलोथ्रीन ९.५% झेड सी या मिश्र कीटकनाशकाची ०.५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५% एस सी या कीटकनाशकाची ०. ४ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>फवारणी करिताना औषध पानावर अथवा इतरत्र न फवारता पोंग्यामध्येच पडेल याची दक्षता घ्यावी जेणे करून औषधाचा परिणाम योग्य दिसेल. |
| सोयाबीन | शेंगा भरण्याची अवस्था | चक्री भुंग्याच्या नियंत्रणाकरिता थायक्लोप्रीड २९.७ एस सी १५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| कपाशी | बोंड धरणे | बोड अळीच्या नियंत्रणाकरिता लॅम्बडा-सायहालोथ्रीन ५% प्रवाही ८ मिली किंवा स्पिनोसॅड ४५ एस सी ३.५ मिली किंवा प्रोफेनोफोस ५० ईसी ३० मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ ईसी १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| तूर | फांद्या फुटण्याची अवस्था | तूर पिकावर खोड माशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>तूर पिकात वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच अशी रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. या रोगाचा प्रसार कोळी या किटकामार्फत होतो. कोळी नियंत्रणासाठी रासायनिक औषधाची फवारणी करावी. |

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**


*वेळेवर पेरणी झालेल्या पिकांकरिता

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २१/०९/२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरीतथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**